प्रेसनोट

जा.क्र. ६४ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– १/०२/२०१८

## ''अपहरण करून बलात्काराचे गुन्हयात आरोपीस १३ वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे वरठी अंतर्गत मौजा खमाटा येथिल तक्रारदार यांनी दिनांक १.०५.२०१६ रोजी तक्रार दिली की, दिनांक २६.०४.२०१६ रोजी १२.०० वाजता निलागोंदी ता. तिरोडा येथे नातेवाईकाडे लग्नाला जात होती तिने आपले अल्पवयीन मुलीस नातेवाईकाकडे लग्नाला येण्याबाबत म्हटले असता मुलीने उणाचे कारन देवुन जाण्यास नकार दिला, फिर्यादी लग्नावरून घरी परत आली असता मुलगी घरी दिसली नाही मुलीबाबत विचारपुस केली असता फिर्यादीचे पतीने मुलगी तुझे सोबत लग्नाला आली होती असे सांगीतले गावात व ईकडे–तिकडे शोध घेतला असता घरा शेजारी लोकांनी सांगीतले की, गुरूवारी १.०० वा. मुलगी एकटीच जातांना दिसली तेव्हा फिर्यादीस संशय आला की, एक महिण्यापुर्वी मुंडीपार येथिल नातेवाईकाचा मुलगा नामे अनिल गोपीचंद मारबदे, वय २२ वर्ष रा. मुंडीपार ता. तिरोडा जि. गोंदिया हा गावात धान चुरण्याचे मशिनवर कामाकरीता आला होता व एक महिणा फिर्यादीचे घरीच राहत होता फिर्यादीचे मुलीशी लगट करण्याचा प्रयत्न करीत होता त्यानेच फिर्यादीचे मुलीस फुसलावुन लग्नाचे आमिष दाखवुन पळवुन नेले अशी तक्रार दिल्यावरून पोलीस नाईक आकांत रायपुरकर यांनी अपराध क्र. ४५/१६ कलम ३६३,३६६ भादवि अन्वये आरोपी विरूध्द गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास सहा. पोलीस निरीक्षक, शरद कदम यांनी सुरू केला सदर तपासा मध्ये दिनांक १३.०५.२०१६ रोजी मुंडीपार येथुन आरोपी व पिडितेस ताब्यात घेतले व पोलीस ठाणे वरठी येथे आणुन आरोपीस अटक केली व पिडित अल्पवयीन मुलीची वैद्यकीय तपासीणी केली त्यामध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगीक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात कलम ३७६(२)(एन) भादवि सह कलम ३,४ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ या कलमांची वाढ करून गुन्हयाचा तपास सुरू केला. त्यानंतर

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक, सागर कारंडे यांनी करून गुन्हयात आरोपी योग्य पुरावे गोळा करून आरोपी विरूध्द भक्कम पुरावा प्राप्त झाल्याने आरोप पत्र तयार करून विशेष सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३६/१६ अन्यवे न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक १. ०२.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी अनिल गोपीचंद मारबदे, वय २२ वर्ष रा. मुंडीपार ता. तिरोडा जि. गोंदिया** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३६३ भादवि अन्वये तिन वर्ष, सश्रम कारावास व ५,०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ३ महिणे सश्रम कारावास, कलम ३७६(२)(एन) भादवि अन्वये १० वर्ष, सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावास** अशी शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक सुरेश ढोबळे यांचे मार्गदर्शनात पो.हवा. सुकरू वलके व महादेव वंजारी पो.स्टे. वरठी यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.**

(एस.आर. तेलुरे)
जि.वि.शा.भंडारा
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.